**तक्रारदार तर्फे साक्षीदार क्र. – ०१**

**फौ.किरकोळ अर्ज क्र. ३९०/२०२२**
**सलमा विरुध्द हैदर**
**निशाणी – १६ च्या खाली**

**मी शपथपूर्वक खरे सांगते की**

**निशाणी २१ कडील आदेशानुसार शपथेवर उलटतपास गैरअर्जदार तर्फे वकील श्री व्ही. जे. गवळी यांच्यातर्फे**

२५. माझे शिक्षण इयत्ता ४थी पर्यत झाले आहे. मला मराठी भाषा वाचता येत नाही. मला मराठी भाषा समजत नाही. हे म्हणणे खरे आहे की मुस्लीम रिवाजानुसार निकाहनामा आवश्यक असतो. हे म्हणणे खरे आहे की त्या निकाहानामा साठी दोन्ही बाजूचे साक्षीदार आवश्यक असतात. निकाह चा प्रस्ताव पहिल्यांदा गैरअर्जदारने दिला होता. त्या प्रस्तावानंतर मी गैरअर्जदार ला थोडे थांबण्यास सांगितले होते. गैरअर्जदारला प्रस्तावाच्या १५ दिवस ते एक महिन्यानंतर होकार कळविला होता. हे म्हणणे खरे आहे की प्रस्तावाचा दिवस व मी होकार कळविल्याचा दिवस हे दोन्ही स्वतंत्र आहेत. हे म्हणणे खरे नाही की निकाह नाम्याचे साक्षीदार कामठी चे होते. साक्षीदार स्वतःहून सांगते की गैरअर्जदारच्या वतीने ५ ते ६ साक्षीदार हजर होते व माझ्या तर्फे ३ ते ४ साक्षीदार हजर होते. निकाह साठी माझ्या तर्फे व गैरअर्जदार तर्फे कोणतीही अट ठेवण्यात आली नव्हती. गैरअर्जदार क्र.२ वाशीम येथे राहतात. गैरअर्जदार क्र.१ चे मुळ गांव वाशीम आहे. मी साधना वाळवे हिला ओळखत नव्हते. ती मौजा वाळकी तालुका जिल्हा वाशीम येथे राहते.

२६. माझे पहिले लग्न झाले होते. पहिल्या लग्नाचा फारकतनामा झाला होता. हे म्हणणे खरे आहे की निकाह वेळी काझी कामठीचे होते. हे म्हणणे खरे आहे की माझ्या आधार कार्ड वर गैरअर्जदार क्र.१ चे नांव नाही. हे म्हणणे खरे आहे की डिसेंबर २०२१ पर्यत लॉकडाउनचा कालावधी होता व त्यामुळे जिल्हा बदलण्यासाठी परवानगी लागत होती. हे म्हणणे खरे नाही की प्रतिज्ञापत्राच्या परिच्छेद क्र.१४ मधील घटनेबाबत मी कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. प्रतिज्ञापत्राच्या परिच्छेद क्र.८ मध्ये नमूद घटनाक्रम मी माझ्या आईवडीलांना सांगितला होता. परिच्छेद क्र.८ मधील घटनेबाबत मी पोलीसात तक्रार केलेली नव्हती.

**प्रश्न** – प्रतिज्ञापत्राच्या  परिच्छेद क्र.५ मध्ये नमूद गैरअर्जदार क्र.५ यांनी नोव्हेंबर २०१९ मध्ये मला पकडून ठेवले व रस्सीने फासी लावण्याचा प्रयत्न केला या बाबत तुम्ही तक्रार दिली नाही ?

**उत्तर** – मला बाहेर जाऊ दिले नाही म्हणून मी तक्रार दिली नाही.

२७.    हे म्हणणे खरे आहे की गैरअर्जदार कडे १०० एकर जमीन आहे हे दर्शविण्यासाठी कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही.  हे म्हणणे खरे आहे की निशाणी १९ कडील निकाहनामा हनीफ बुक डेपो येथून घेतलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की माझा गैरअर्जदार क्र.१ सोबत निकाह झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे गैरअर्जदार क्र.२ ते ६ यांनी मला मानसिक, आर्थिक व शारीरीक त्रास दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिज्ञापत्राच्या परिच्छेद क्र.९ मध्ये नमूद घटना माझ्या सोबत घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटा अर्ज केला आहे व खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला**.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

**स्वाक्षरी/–**
( अमित अ. कुळकर्णी )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र.१, कामठी

कामठी
दिनांक १४/१२/२०२३